THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

SATURDAY, 22ND FEBRUARY 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८८१ चा बेचनी दस्तऐवजांचा आक्ट सुधारण्याबाबदचा आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी सन १८८१ चा बेचनी दस्तऐवजांचा आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. सदरहू आक्टाच्या ७२व्या कलमाबद्दल खालील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :— सन १८८१ चा आक्ट २६, याच्या ७२ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

"७२. (१) ज्या पेढीवर चेक लिहिला असेल त्या पेढीवर तो, ऐवज घेण्याकरितां—

(अ) लिहिणारास जबाबदार धरण्यास, त्याच्या तारखेनंतर किंवा तो देयीच्या स्वाधीन केल्यानंतर किंवा लिहिणारा व पेढीवाला यांच्या परस्परसंबंधामध्यें लिहिणारास विरुद्ध असा फेरफार होण्यापूर्वीं, ह्मणजे यांतून जी मुदत शेवटीं संपेल त्याप्रमाणें, वाजवी वेळाच्या आंत,

(ब) लिहिणाराखेरीज इतर कोणाही मनुष्यास, जबाबदार धरण्यास, त्या मनुष्यानें तो स्वाधीन केल्यानंतर वाजवी वेळाच्या आंत,

दाखविला पाहिजे."

२. सदरहू आक्टाचें ७३ वें कलम यावरून रद्द केलें आहे. सन १८८१ चा आक्ट २६, याचें ७३ वें कलम रद्द करणें.

३. सदरहू आक्टाच्या ८४व्या कलमाबद्दल खालील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :— सन १८८१ चा आक्ट २६, याच्या ८४ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

"८४. (१) जेव्हां चेकच्या धारकानें चेक आपल्या स्वाधीन झाल्यानंतर ऐवज घेण्याकरितां तो वाजवी वेळाच्या आंत दाखविला नसून लिहिणारास किंवा ज्याच्या खातीं तो लिहिला असेल त्या मनुष्यास, तो शिरस्तेवाईक रीतीनें ज्या वेळीं दाखवावयास पाहिजे होता त्या वेळीं त्या चेकचा ऐवज पेढीवाल्याकडून अदा होण्याचा हक्क होता असें असेल, व तो याप्रमाणें दाखविण्यांत विलंब झाल्यामुळें त्याचें [ लिहिणाराचें किंवा सदरहू मनुष्याचें ] खरोखर नुकसान झालें असेल, तेव्हां त्या कारणानें तो, अशा नुकसानाच्या यत्तेपर्यंत, ह्मणजे, त्या चेकचा ऐवज अदा केला असता तर तो पेढीवाल्याचा चेक योग्य वेळाच्या आंत दाखविला नाहीं व लिहिणाराला त्यापासून नुकसान झालें तर.

जेवढ्या रकमेबद्दल धनको असता तिच्याहून जितक्या जास्त रकमेबद्दल तो त्याचा धनको असेल तितक्या रकमेपर्यंत, धारकाशीं असणाऱ्या जबाबदारींतून मुक्त होईल.

(२) लिहिणारा ज्या चेकच्या संबंधानें पोटकलम (१) याअन्वयें सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं जबाबदारींतून मुक्त झाला आहे त्या चेकचा धारक जेव्हां किंमतीच्या मोबदल्याकरितां त्या चेकचा शेरेकरी असेल, तेव्हां त्या कारणानें त्याचा शेरालिहिणारा व त्या चेकचे अगोदरचे सर्व शेरालिहिणारे हे, अन्यथा कोणताही करार नसल्यास, सदरीं सांगितल्याप्रमाणें जबाबदारींतून जितक्या यत्तेपर्यंत लिहिणारा याप्रमाणें मुक्त झाला असेल तितक्या यत्तेपर्यंत अशा मोबदल्याच्या संबंधानें त्या धारकाशीं असणाऱ्या जबाबदारींतून मुक्त होतील.

(३) लिहिणारा ज्या चेकच्या संबंधानें पोट-कलम (१) याअन्वयें जबाबदारींतून मुक्त झाला आहे त्या चेकचा धारक, ज्या पेढीवाल्यावर तो चेक लिहिला असेल त्याचा, लिहिणाराच्या ऐवजीं, अशा मुक्ततेच्या यत्तेपर्यंत, धनको होईल, आणि त्यापासून त्या चेकची रकम वसूल करण्याचा त्याला हक्क प्राप्त होईल.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

---

बेचनी दस्तऐवजांचा आक्ट ( सन १८८१ चा २६ ) याच्या ८४ व्या कलमाअन्वयें जेव्हां, ज्या पेढीवाल्यावर चेक लिहिला असेल त्यास तो ऐवज घेण्याकरितां वाजवी वेळाच्या आंत दाखविला नसून अशा विलंबामुळें लिहिणाराचा तोटा किंवा नुकसान झालें असेल, तेव्हां धारकास अशा चेकच्या संबंधानें लिहिणाराविरुद्ध दावा सांगतां येत नाहीं, किंवा पेढीवाल्याच्या मालमत्तेचा धनको या नात्यानें आपला ऐवज वसूल करून घेण्याचाही अधिकार त्यास सदरहू आक्टावरून नाहीं. सबब या मसुद्याचा उद्देश असा आहे कीं, अशा बाबतींत लिहिणाराच्या मुक्ततेची यत्ता, चेक योग्य वेळीं दाखविला असता तर त्याचा ऐवज अदा करण्यासाठीं पेढीवर अशा लिहिणाराची जी शिलक असती तिच्याहून त्या चेकची रकम जास्त नसल्यास तिच्या पुरतीच ठरवून, आणि धारकास जी रकम लिहिणाराकडून वसूल करतां येत नाहीं तिच्याबद्दल पेढीवाल्याच्या मालमत्तेवर शाबिती करण्याचा त्यास अधिकार देऊन, या देशाचा कायदा इंग्लंड देशाचा सन १८८१ चा बिल्स आफ् एक्स्चेंज आक्ट ( ४५ व ४६ व्हिक्टो., बा. ६१ ) याच्या ७४ व्या कलमाच्या ठरावांशीं जुळता करावा. याच संधीस आणखी दर्म्यानचे शेरालिहिणारे यांचा, त्यांच्या शेरेकऱ्यांकडून चेक दाखविण्यामध्यें झालेल्या विलंबामुळें होणाऱ्या तोट्यापासून किंवा नुकसानापासून सदरीलप्रमाणें बचाव करण्याविषयींही ठराव केला आहे.

तारीख ६ माहे फेब्रुवारी सन १८९६. ए. इ. मिलर.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.